SHIVAJI COLLEGE HINGOLI

22-23

आज़ादी का अमृत महोत्सव

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2023 - Impact Factor : 8.024

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 8, Vol. I, Issue- LXXVII, Jan. 2023

Chief Editor
Dr. Venkatanarayana Miriyam
Assistant Professor of Commerce and PG Coordinator,
Government Degree College Sindhanur, Karnataka.

T.C.

Assistant Professor
Shivaji College Hingoli
Tq & Dist. Hingoli (M.S.)

## Quartly Research Journal

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)



Scanned with OKEN Scanner

ISSN: 2454 – 7905
*SJIF Impact Factor:* 8.024

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

***A Peer Reviewed Referred Journal***

**Quarterly Research Journal**

**(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)**

**www.wiidrj.com**

**Vol. I ISSUE - LXXVII Year – 8 Jan. 2023**

SHIVAJI COLLEGE HINGOLI

**:: Editor in Chief ::**

**Dr. Venkatanarayana Miriyam**
Assistant Professor of Commerce and PG Coordinator
Government Degree College Sindhanur, Karnataka

**Address for Correspondence**

**Editor in Chief : Mrs. Pallavi Laxman Shete Website: www.wiidrj.com**
House No.624 – Belanagar, Near Maruti Temple, Taroda (KH), Nanded – 431605 (India – Maharashtra) **Email:** Shrishprakashan2009@gmil.com / umbarkar.rajesh@yahoo.com
**Mob. No:** +91-9623979067 **Director : Mr. Tejas Rampurkar**
(For International contact only +91-8857894082)



T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)

269

Scanned with OKEN Scanner

# आजचा युवक आणि युवकां समोरील अव्हाने

**प्रा. डॉ. भुसारे एस. आर.**
तत्त्वज्ञान विभाग,
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

SHIVAJI COLLEGE HINGOLI

**गोषवारा :-**

विज्ञान युगात वावरत असताना आज घडीला प्रत्येकाने अद्यायावत राहणे गरजेचे झाले आहे. प्राचीन काळात जगामध्ये जो विकास झाला तो आणि 20 व्या शतकातील मागील 10 वर्षात जो विकास झाला तो यांची तुलना करत असताना काही तथ्य समोर येतात. ते असे की मागील 10-15 वर्षात आपण माहितीच्या जंजाळात सापडलो आहेत. इंटरनेटला मराठी 'अंतरजाळे' किंवा 'आंतरजाल' असे म्हणतात. या माहितीच्या जाळयामुळे जग खूप जवळ म्हणजे हाकेच्या अंतरावर आले आहे. आज जगाच्या पाठीवर आपण कोठेही असू आपण आपल्या जिवलग माणसांशी तात्काळ संपर्क साधू शकतो. त्यामुळे असे म्हटले जाते की आता जग खूप जवळ आले आहे. त्यामुळे आजच्या युवकालाही अद्ययावत राहणे गरजेचे ठरत आहे. प्रस्तुत शोधनिबंधात या संदर्भाने विचार केला जाणार आहे.

**संज्ञा :-**

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या विषयाच्या अनुषंगाने विचार करत असताना काही बाबी महत्त्वपूर्ण ठरतात त्याम्हणजे प्रस्तुत संशोधन विषयाची व्याख्या करणे होय. प्रस्तुत विषय आहे आजचा युवक आणि युवकासमोरील अव्हाने. यातील महत्त्वपूर्ण घटक म्हणजे 'युवक' 'अव्हाने' हे होत. शोध घेत असताना या दोन घटकांची व्याख्या करणे गरजेचे आहे. ती या शोधनिबंधात केली जाणार आहे.

**प्रस्तावना :-**

वरील विषयाच्या अनुषंगाने विचार करत असताना परिस्थितीनुरुप विषयाचे गांभीर्य ओळखणे महत्त्वाचे वाटते. आज ज्या वेगाने जग पुढे पुढे जात आहे त्या वेगाने प्रत्येक युवकाने चालणे गरजेचे आहे. म्हणजेच प्रत्येकाने बदल स्वीकारून त्याचे स्वागत करून त्याच्या सोबत हात मिळवत चालणे फार महत्त्वपूर्ण ठरणार आहे. म्हणून प्रत्येक युवकांनी तत्पर असणे गरजेचे आहे. प्रस्तुत शोधनिबंधात यासंबंधी काही निष्कर्ष काढण्यात येणार आहे. युवक हा समाजाचा कणा असतो त्याने सतत क्रियाशील असले पाहिजे. त्याने कधीही थकता कामा नये. त्या अनुषंगाने आजच्या युवकाची 'दशा'आणि 'दिशा' या संदर्भात प्रस्तुत शोधनिबंधात काही निष्कर्ष मांडण्यात येणार आहेत. त्यात आजच्या परिस्थितीचाही विचार केला जाणार आहे. युवकाचे अधिकार आणि कर्तव्यासंबंधी विचार केला जाणार आहे.

**उद्देश :-**

1) माहिती तंत्रज्ञानाचे महत्त्व आजच्या युवकाला पटवून देणे.

2) आजच्या भरकटत चाललेल्या युवकाला सावरण्यासाठीच्या उपाययोजना आखणे.

3) युवकाला योग्य दिशा दाखवून संधीचं सोनं करण्याचे अवाहन करणे.

4) युवकाला जीवन मौलिक आहे याची जाणीव करून देणे.

T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)





Scanned with OKEN Scanner

**विषय विश्लेषण :-**

प्रस्तुत शोधनिबंधात आजच्या युवकासंबंधी सविस्तर विचार करावयाचा आहे. आज या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात किंवा अंतरजालांच्या युगात आजचा युवक भरकटत चालला आहे की काय ? याची सातत्याने एक प्रकारची भीती वाटू लागली आहे. कारण जग एवढ्या वेगाने आणि झपाट्याने बदलू पाहत आहे की त्याचा वेग मोजणे असंभव झाले आहे. वर म्हटल्याप्रमाणे प्राचीन काळापासून अगदी 19 व्या शतकापर्यंत जो बदल घडून आला त्याच्या वेगाचा आणि 20 व्या शतकातील वेगाचा अभ्यास केला तर असे दिसून येत आहे की आज या माहितीच्या मायाजालात प्रत्येकजण भरकटत जात आहे. वैज्ञानिक संशोधनाच्या माध्यमातून मानवाने स्वतःचा विकास साधला आहे. आदिमानवाचा विचार केला तर एक गोष्ट लक्षात येते ती ही की मानवाला चाकाचा शोध लागला आणि मानवाच्या प्रगतीला, विकासाला गती मिळाली. या विश्वात मानव हाच एक असा प्राणी आहे की तो पंचज्ञानेंद्रिया शिवाय सहावे एक इंद्रिय म्हणजे 'मन' किंवा बुद्धीचा वापर करतो. म्हणून त्याला समनस्क प्राणी असेही म्हटले जाते. मानवाच्या प्रगतीचे तीन टप्पे ढोबळ मनाने आपल्याला करता येतील. ते म्हणजे प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक कालखंड. प्राचीन काळात मानवाने विकास किंवा प्रगती केली पण ती काहीशी चाचपडत- चाचपडतच होय. आणखी त्याला म्हणावी तशी दिशा मिळाली नव्हती. पण म्हणून त्याने केलेल्या त्या विकासाला कमी लेखून चालणार नाही. त्या जोरावरच तो मध्ययुगीन काळात आला. मध्ययुगीन कालखंडात मात्र त्याच्या प्रगतीला चांगलाच वेग मिळाला. जगात अनेक युद्धे तसेच दोन महायुद्धे झाली. अनेक राज्यक्रांत्या झाल्या. एक औद्योगिक क्रांती झाली. सर्वसामान्यांना स्वत्वाची जाणीव झाली. वैज्ञानिक विकासाला सुरुवात झाली. वेगवेगळे नवनवीन शोध लावले गेले. दळण-वळणाची साधने वाढली. माल याठिकाणाहून त्या ठिकाणी कमी वेळात व सुरक्षितपणे पोहचू लागला. सर्वसामान्य माणसाच्या हाती पैसा आला. त्याला आता चैनीच्या वस्तूंची आठवण येवू लागली. त्यामध्ये मुख्यत्वे करून मनोरंजनाची साधने उपलब्ध होऊ लागली. त्यामध्ये टेलिव्हिजन आले. घरबसल्या जगाची इतीवार्ता कळू लागली. घरबसल्या मनोरंजन होऊ लागले.

त्यामुळे सामान्य माणसाच्या ज्ञानात भरच पडू लागली. 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात मोबाईलचा शोध लागला आणि मानवाचा विकास होऊ लागला. जणू त्याला पंख फुटले. अंतरजाल माहितीच्या स्वरूपात त्याच्याभोवती पसरू लागले. या टप्प्यावर मानवाने प्रगती केली ती अतिउच्च कोटीची. माणूस जसा सर्वत्र विहार करू लागला तशी त्याच्या ज्ञानातही आफाट भर पडली. आपण म्हणतो जग जवळ आलं पण प्रत्यक्षात मात्र माणसा-माणसांची मने दुरावली गेली. हा बदल मोबाईल, इंटरनेट आणि अशा अनेक प्रंसारमाध्यमांच्या मुळे झाला हे लक्षात घेतले पाहिजे. आज संशोधनांती असे सिद्ध झाले आहे की सर्वात जास्त इंटरनेटचा वापरकरता वर्ग हा तरुण किंवा युवा वर्ग आहे. व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम सारख्या माध्यमांनी आजच्या तरुण वर्गाला वेड लावले आहे. विज्ञान हे मानवाच्या जीवनातील वरदानही आहे तसेच ते शापही आहे. विज्ञानाचा गरजेपुरता वापर केला तर ते मानवी जीवनासाठी वरदान ठरते. कारण विज्ञानाच्याच माध्यमातून मानवाने आजची उत्तुंग भरारी घेतली आहे. प्रगतीच्या सर्वोच्च यश शिखरावर तो जावून पोहोचला, त्याने आकाशाला गवसणी घातली. निसर्गाच्या या आफाट पसाऱ्यात त्याने स्वतःचे जग निर्माण करण्याचा प्रयत्न केला. काही ठिकाणी तर त्याने निसर्गावरही मात केली आहे. उदा:- जैव वैद्यकीयशास्त्राच्या क्षेत्रात हे घडल्याचे आपल्याला दिसून येते. पण असे असले तरी या सर्व विकास, बदल, वैज्ञानिक संशोधनाचा विपरीत परिणाम असा आहे की या वैज्ञानिक संशोधनामुळे आजचा युवक मात्र कामातून चालला आहे.



SHIVAJI COLLEGE HINGOLI

SHIVAJI COLLEGE HINGOLI

त्यामुळे या माहितीच्या मायाजालात योग्य काय ? अयोग्य काय ? या गोष्टी समजणे अशक्य झाले आहे. त्यात आजचा युवक वाहवत जात आहे.

तरुण हा समाजाचा भावी नागरिक असतो पण आज ज्या पद्धतीने ज्या परिस्थितीत तो आहे ती परिस्थिती अंधकारमय असलेला पाहायला मिळते आहे. प्रसिद्ध विचारवंत दादा धर्माधिकारी यांनी तरुणांची व्याख्या केली आहे. त्यांना अपेक्षित असलेला तरुण हा कसा पाहिजे तर "तो तेजस्वी, तत्पर, तपसविता हे तीन महत्त्वपूर्ण गुण तरुणाच्या अंगी असले पाहिजे" असे दादा धर्माधिकारी म्हणतात. म्हणजे तरुणाच्या चेहऱ्यावर तेज असले पाहिजे. त्याच्या चेहऱ्यावरती तेज तळपले पाहिजे, तरुण म्हटला की तो 24 तास बाराही महिने तत्पर असला पाहिजे. तसेच तरुणाचे आणखी एक महत्त्वाचे लक्षण म्हणजे तो तपस्वी असला पाहिजे. तपस्वी याचा अर्थ तो तपकरत हिमालयात जाऊन बसलेला असा तरुण दादांना अपेक्षित नाही तर तो निश्चयी, निग्रही असला पाहिजे असा याचा अर्थ त्यांना अपेक्षित आहे. तरुणांच्या खांद्यावर समाजाच्या विकासाची धुरा असते. म्हणून प्रत्येक तरुणाच्या अंगी हे गुण असले पाहिजे असे ते म्हणतात. पण आजचा तरुण हा तर याच्या उलट असलेला आपल्याला दिसून येतो. तो इंटरनेट, मोबाईलच्या महाजाळात गुरफटला आहे. त्यामुळे तो क्रूर, आतंकवादी, दहशतवादी, गुन्हेगार या क्षेत्राकडे क्राईम सिरीज बघून-बघून मोठ्या प्रमाणात वळतो आहे असे चित्र दिवसेंदिवस स्पष्ट होत चालले आहे. ही खेदाची बाब आहे. वर उल्लेखील्या प्रमाणे तारुण्याचे तीन प्रकार या शीर्षकाखाली दादा धर्माधिकारी यांनी अतिशय तळमळीने मांडले आहेत, सांगितले आहेत. त्यांच्या मते तरुणांनी सतत हे तीन गुण अंगीकारले पाहिजेत. याच अर्थाचे म्हणणे स्वामी विवेकानंदाचे सुद्धा आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात युवक किंवा तरुण हा सतत चैतन्यमय असला पाहिजे. सळसळत रक्त हे तारुण्याचे प्रतीक असते. तरुणाने नेहमी कसे असावे याविषयी

चेहऱ्यावर तेज आहे
देहामध्ये शक्ती आहे
मनामध्ये उत्साह आहे
बुद्धीमध्ये विवेक आहे
हृदयामध्ये करूणा आहे
मातृभूमीवर प्रेम आहे
इंद्रियांवर संयम आहे
मन ज्याचे स्थिर आहे
आत्मविश्वास दृढ आहे
इच्छाशक्ती प्रबळ आहे
धाडसाचे बळ आहे
सिंहासारखा निर्भय आहे
ध्येय ज्याचे उच्च आहे

अशा प्रकारचे उददात्त विचार युवका संबंधी स्वामी विवेकानंद यांचे आहेत. युवक म्हणजे तेज शक्ती, उत्साह, विवेक, करुणा, प्रेम, संयम, स्थिरता असे सर्व सदगुण ज्याच्या ठिकाणी एकवटले आहेत तो युवक असे विवेकानंद म्हणतात. कारण युवा अवस्थेतच जे अशक्य ते शक्य करून दाखवण्याची ऊर्जा असते. म्हणून युवक हा



Lecturer
Shivaji College,Hingoli
Ta.& Dist.Hingoli (MS.)

समाजाचा भावी नागरिक असतो. तो जर दृढ आणि भक्कम विचारांच्या पायावर उभा असेल तरच भावी समाज अतिउच्च यशाच्या शिखरावर जाऊ शकतो म्हणून युवकाकडून असंख्य अशा अपेक्षा असतात. त्या दृष्टिकोनातून आजच्या युवकाने आचरण करण्याचा विचार केला पाहिजे. राष्ट्रभक्ती राष्ट्रप्रेम जर युवकात ओतप्रोत भरलेले असेल तरच राष्ट्राचा विकास होऊ शकतो. असे विचार स्वामी विवेकानंदानी व्यक्त केले आहेत. दुष्ट प्रवृत्ती पासून युवकाने दूर राहिले पाहिजे. दुःप्रवृत्तीच्या लोकांमुळे समाज उन्नतीपासून दूर नेला जातो. म्हणून समाजाच्या विकासासाठी युवकांनी सतत खडापहारा देवून, जागरूक राहिले पाहिजे. युवकांनी नेहमी पुरोगामी विचाराचा स्वीकार केला पाहिजे. कालबाह्य विचार, रुढी अनिष्ट प्रथा परंपरांना त्याने तिलांजली दिली पाहिजे. मानवतावाद, शाश्वत विकास याकडे त्याने जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे. चैतन्याने रसरसलेल्या देहाने त्यांनी समाजाभिमुख, समाज विकासची पावले उचलली पाहिजे. ध्येयवाद, राष्ट्रोन्नतीचा ध्येयवाद त्याने स्वीकारला पाहिजे.

आजच्या युवकासमोर माहितीचे मायाजाल प्रसारमाध्यमे, दुष्टप्रवृत्ती अशी अनेक अव्हाने आहेत. बेरोजगारी, बेकारी, शिक्षणाबद्दलची उदासीनता या सर्व अव्हानांवर मात करावयाची असेल तर आजच्या युवकांनी दादा धर्मदाधिकारी, विवेकानंद यांच्या विचारांची कास धरली पाहिजे. तरच तो ध्येयनिष्ठ बनून समाज विकासाचा विचार करू शकतो. आज समाजकारणात प्रत्येक ठिकाणी राजकारण घुसलेले असल्यामुळे युवकांनी जागरूक राहणे गरजेचे आहे. कारण जिथे समाजकारणात राजकारण घुसते तिथे स्वार्थ बोकाळल्याशिवाय रहात नाही. आणि जिथे स्वार्थ असतो तिथे सार्वजनिक विकास थांबतो हे धोके ओळखून आजच्या युवकाने या सर्व अव्हानांना तोंड देण्यासाठी समर्थपणे उभे राहिले पाहिजे.

**निष्कर्ष :-**

1) युवकांनी सतत जागरूक असावे.

2) त्यांनी परिवर्तनाचा विचार स्वीकारला पाहिजे.

3) युवक हे भावी पिढ्यांचे शिलेदार असतात.

4) जबाबदार नागरिक म्हणून जगले पाहिजे.

**संदर्भ सूची :-**

1) दादा धर्माधिकारी यांचे विचार.

2) युवक कसा असावा ? स्वामी विवेकानंद

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Ta.& Dist.Hingoli.(M.S.)



Scanned with OKEN Scanner